**MHAK110005672026**

**<u>एम. जे. सी. क्र. १२२/२०२६ चे निशाणी क्र. १ खालील आदेश</u>**

**अन्नपुर्णा व ईतर — वि.— निरंक**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ची आई व अर्जदार क्र.२ ची सासू तसेच अर्जदार क्र.३ व ४ ची आजी मयत नामे जयंताबाई यादव भोजने यांचा मृत्यु दिनांक १९.०७.१९७८ रोजी झाला आहे. अर्जदार क्र.१ चे भाउ व अर्जदार क्र.२ चे दीर तसेच अर्जदार क्र.३ व ४ यांचे काका मयत पुरुषोत्तम उर्फ रुस्तम यादवजी भोजने यांचा मृत्यु दिनांक १७.१०.२०१४ रोजी व मयत उत्तम यादवराव भोजने यांचा मृत्यु दिनांक १८.११.२०११ रोजी झाला आहे. मयत पुरुषोत्तम उर्फ रुस्तम यादवजी भोजने व मयत उत्तम यादवराव भोजने यांचे हे अविवाहीत होते. अर्जदार क्र.२ चे पती व अर्जदार क्र.३ व ४ यांचे वडील नामे रामु यादवजी भोजने यांचा मृत्यु दि.०४.०९.२००७ रोजी झाला. मयत जयंताबाई यादव भोजने हे भांबेरी, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील रहीवासी होते. अर्जदार असे कथन करतात की, मयत यांना अर्जदारांव्यतिरीक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हेच मयत जयंताबाई यादव भोजने यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक ०६.०५.२०२६ रोजीच्या 'दैनिक सायरन' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार क्र.३ याने त्याचे अर्जाचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०९ दाखल केले. त्याने त्याच्या सरतपासात त्याच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत जयंताबाई यादव भोजने यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.क्र.१० वर, मयत पुरुषोत्तम उर्फ रुस्तम यादवजी भोजने यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.क्र.११ वर, मयत उत्तमराव यादवराव भोजने यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.क्र.१२ वर, अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत नि. क्र. १३ ते १६ वर तसेच दिनांक ०६.०५.२०२६ रोजीचे 'दैनिक सायरन' मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र.१७ वर दाखल केलेले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्ताऐवज विना उजर व आक्षेपविना राहीले आहे.

५. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १८ वर दाखल केली आहे. संपुर्ण दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता व वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत जयंताबाई यादव भोजने यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार क्र. १ अन्नपुर्णा श्रीकृष्ण आग्रे, रा. करतवाडी, ता. अकोट, जि. अकोला, अर्जदार क्र.२ सुमन रामकृष्ण भोजने, अर्जदार क्र.३ राहुल रामकृष्ण भोजने, अर्जदार क्र. २ व ३, रा. भांबेरी, ता. तेल्हारा, जि. अकोला, अर्जदार क्र.४ विद्या सुभाष तायडे, रा. निंबा, ता. बाळापुर, जि. अकोला, हे मयत जयंताबाई यादव भोजने यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.07.06 17:03:16 +0530

(श्रीमती एन. व्ही. साहु)

दिनांकः–०६.०७.२०२६

दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,

तेल्हारा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Telhara. |
| Date of Order /Judgment | 06.07.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 06.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 06.07.2026 |